म्हाडातर्फे ५ हजार ८६३ सदनिकांसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात

पुणे : महाराष्ट्र गृहनिर्माण आणि विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर व सांगली येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या ५ हजार ८६३ सदनिका विक्रीच्या संगणकीय सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला असून २६ सप्टेंबरपर्यंत अर्ज नोंदणी करता येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते मंगळवारी (दि.५) म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात हा शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्री. जयस्वाल यांनी सांगितले की नूतन एकात्मिक गृहनिर्माण लॉटरी व्यवस्थापन संगणकीय प्रणालीद्वारे पुणे मंडळ सदनिका विक्री करिता सोडतीची प्रक्रिया राबवली जात असून सोडत काढल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्काळ ऑनलाईन प्रथम सूचना पत्र, स्वीकृती पत्र व तात्पुरते देकार पत्र पाठवण्याची कार्यवाही केली जाणार आहे. म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी अशोक पाटील म्हणाले, म्हाडाने विविध उत्पन्न गटातील नागरिकांसाठी पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर व सांगली शहरातील ५ हजार ८६३ सदनिकांची सोडत जाहीर केली आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत २६ सप्टेंबर असून घरांची सोडत १८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला तसेच ज्या आरक्षण असणाऱ्या वर्गातून अर्ज करत आहे त्याचे प्रमाणपत्र असे पुरावे ऑनलाईन सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अर्जाची छाननी देखील ऑनलाईन होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याचा पर्याय मंडळातर्फे नागरिकांकरीता खुला राहणार आहे. नोंदणी केलेल्या अर्जदारांना २७ सप्टेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आहे. ऑनलाईन अनामत रक्कमेची स्वीकृती २८ सप्टेंबरपर्यंत केली जाणार आहे. २९ सप्टेंबर रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत आरटीजीएस, एनइएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जांची प्रारूप यादी ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादीवरील अर्जदारांना ऑनलाईन दावे, हरकती १२ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करता येणार आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. सोडतीत पुणे जिल्ह्यासाठी ५ हजार ४२५ सदनिका, सोलापूर जिल्ह्यासाठी ६९ सदनिका, सांगली जिल्ह्यासाठी ३२ सदनिका व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

थोडक्यात

अल्टो गाडीची दुचाकीला धडक युवकाचा जागीच मृत्यू

निरगुडसर : लाखनगाव ता. आंबेगाव गावच्या हद्दीत चारंग बाबा गायरानाच्या समोर बेल्हे जेजुरी हायवे रोडवर अल्टो गाडीने दुचाकी ला मागून दिलेल्या धडकेत दुचाकीवरील १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक ६/९/२०२३ रोजी सकाळी साडेनऊ वाजता घडली आहे. याबाबत दत्तात्रय दौंड यांनी पारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी दि.६ रोजी रसिक रंगनाथ दौंड वय १९ रा. लाखनगाव दौंडवस्ती ता. आंबेगाव हा सकाळी त्याच्याजवळ असलेली दुचाकी एम.एच १४ सी क्यू ९८३१ हिच्यावरून जात असताना बेल्हे जेजुरी महामार्गावरून पाठीमागून येणाऱ्या अल्टो गाडी नंबर एम एच १० के एस ८०८७ हिने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील रसिक याला हातापायास व डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी अल्टो चालक सागर भिमाजी साळवे रा. साकुर मांडवे ता. संगमनेर जि. अहमदनगर यांच्यावर पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स.पो. निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना सागाडे करत आहेत. रसिक दौंड याच्या अपघाती मृत्यूने लाखनगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नुकतीच दहावीचे शिक्षण पूर्ण झालेल्या रसिक हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या जाण्याने दौंड कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आधारबाबत कुशल प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

पुणे : भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, मुंबई व विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यातील आधार ऑपरेटर्सना प्रशिक्षण देण्याकरिता एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त वर्षा लड्डा, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, तहसिलदार अंजली कुलकर्णी, मनोज जाधव, प्रकल्प संचालक दिपक शिर्के, आधार प्रशिक्षक किर्ती मदलानी, आधार जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येक तालुक्यात जावून नागरिकांना त्यांचे आधार कार्ड अद्ययावत करण्याबाबत माहिती द्यावी. प्रौढांना नवीन आधार कार्ड नोंदविणेबाबत सकारात्मक दृष्टीकोनातून सहकार्य करावे. त्यांच्या जिल्ह्यातील आधार ऑपरेटरसना या प्रशिक्षणाबाबतची माहिती द्यावी व पुणे विभागातील आधार नोंदणीचे कामकाज गुणवत्तापूर्वक करावे, असे आवाहन उपायुक्त श्रीमती लड्डा यांनी यावेळी केले. यावेळी पुणे विभागामधील ५ जिल्ह्यातील प्रत्येकी २५ मास्टर ट्रेनर्सला प्रशिक्षित करून, त्यांच्यामार्फत पूर्ण विभागातील आधार विषयक सुलभ कार्यप्रणाली, नवीन आव्हाने, त्यावरील उपाययोजना व आधारसंबंधित कायदे विषयक तरतूदीबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

परिवहन वाहनांसाठी नोंदणी क्रमांकाची नवीन मालिका

पुणे / प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच परिवहन वाहनांसाठी 'एलबी' ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक परिवहन वाहनांसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच परिवहन वाहनांसाठी 'एलबी' ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक परिवहन वाहनांसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नव्याने सुरु होणाऱ्या परिवहन मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. परिवहन मालिकेतील उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक परिवहन वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय.आर. टी.ओ., पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनूसचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्त्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

चारचाकी वाहनांसाठी क्रमांकांची यादी ११ सप्टेंबर रोजी सकाळी कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास ११ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधीत अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.

परिवहन मालिकेची यादी १२ सप्टेंबर रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या मालिकेतील अर्जदारांना लिलावाकरीता जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास १२ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केलेल्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. वाहन क्रमांक आरक्षित केल्याचे संदेश मोबाईलवर आल्यानंतर पाचव्या दिवशी पावती कार्यालयातून मिळणार आहे.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व शुल्क सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नाही. आकर्षक क्रमांकाचे शुल्कामध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे विहीत केलेले शुल्क लागू करण्यात येणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र. ०२०/२६१२२४८५

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक ५० सन २०२३ २०२४

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक २६१२२४८५/२६१२२४१४) हे तत्सम अनुभवी तसेच निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या वास्तुशास्त्रीय सेवा सल्लागार अथवा संस्था यांचेकडून खालील कामांकरीता रिक्वेस्ट फॉर प्रपोझल नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	इसारा / प्रासेसिंग फी	निविदा संचाची किंमत	प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार वर्ग
१	डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे येथील भाषाशास्त्र विभाग प्रेक्षागृह हॉल आणि इमारती क्र. १ यांचे नुतनीकरण करणे आणि डेक्कन कॉलेज येरवडा पुणे येथील मुलांचे वसतीगृह फॅकल्टी होस्टेल बेस्ट हाऊस इमारतीचे नुतनीकरण करणे.	रू.७,६४,२६,२५५/-	रू.३,८२,१३१/- (Including GST 18%) ना-परतावा	तत्सम अनुभवी तसेच निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या प्रकल्प वास्तुशास्त्रीय सेवा सल्लागार अथवा संस्था

ई- निविदेचे वेळापत्रक

१	रिक्वेस्ट फॉर प्रपोझल ई-निविदा उपलब्ध कालावधी/ऑनलाईन विक्री कालावधी	दि. ०७/०९/२०२३ वेळ सकाळी १०.०० वा. ते दि. २१/०९/२०२३ वेळ सायंकाळी १८.०० वा. पर्यंत.
२	निविदा पुर्व चर्चा बैठक (Pre-bid Meeting) स्थळ, दिनांक व वेळ	दि. १२/०९/२०२३ रोजी वेळ सकाळी १२.०० वाजता. मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे, नवीन मध्यवर्ती इमारत आवार, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये..
३	रिक्वेस्ट फॉर प्रपोझल ई-निविदा निविदा सादर करावयाचा कालावधी.	दि. ०७/०९/२०२३ वेळ सकाळी १०.०० वा. ते दि. २१/०९/२०२३ वेळ सायंकाळी १८.०० वा. पर्यंत.
४	ई निविदा उघडणेचा दिनांक व वेळ.	दि. २४/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. (शक्य झाल्यास) मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, पुणे यांचे कार्यालयामध्ये

टिप :- खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे. **१.** web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना) **२.** https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवर कळविण्यांत येईल.) **३.** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे - १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

सही/-
(डॉ. सुरेंद्रकुमार र. काटकर)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

क्र. आरओसी-२०२३-२४ /क्र-५/८३३३६

एकस्तर वेतनश्रेणी मंजूर करण्यात अखिल शिक्षक प्राथमिक शिक्षक संघटनेस यश

जुन्नर : एकस्तर वेतनश्रेणीच्या सन २०२२च्या शासन निर्णयातील लाभापासून वंचित असलेल्या पदवीधर शिक्षक ४७, मुख्याध्यापक २ ,केंद्रप्रमुख ५, आणि विस्तार अधिकारी २असे एकूण ५६ कर्मचारी वंचित होते याबाबत संघटनेच्या माध्यमातून व तालुक्यातील पदाधिकारी ,संबंधित विभागाचे कर्मचारी वअधिकारी यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून सदरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात संघटनेला यश आले आहे. शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.पुणे यांनी एकस्तर वेतनश्रेणी मंजूरीचे आदेश दि.५ सप्टेंबर रोजी दिले आहे . यामुळे जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील सर्वांना याचा लाभ होणार आहे. तसेच यापूर्वीही या क्षेत्रात काम केलेल्या सर्वच कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. अखिल प्राथमिक शिक्षक संघ नेहमीच कर्मचा-यांच्या हिताचे प्रश्न सोडविण्यास बांधिल आहे. शिक्षक बांधवांच्या प्रश्नाबाबत सातत्याने आपल्या ध्येयाशी संघटना कटिबद्ध असून या सर्व महत्वपूर्ण कामाकरीता आनंदा मांडवे, सुभाष मोहरे,विवेक हांडे तुकाराम हगवणे यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

जाहीर नोटीस

सर्वसाधारणपणे जनतेला जाहीर नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडने खाली दिलेल्या वाहनांचा लिलाव आयोजित केला आहे.
१ – सीबी – एक्सएल ६ – मारूती सुझुकी **MH45AQ0616** वायओएम – २०२१ राखीव किंमत : ५८५०००/– २ – सीबी – टाटा एसी **MH11DD2885** वायओएम –२०२३ राखीव किंमत : २६१०००/– ३ –सीबी इन्ट्रा **V30-BS_VI_ MH13DQ5117** वायओएम – २०२३ राखीव किंमत : ३१०५००/– ४– सीबी टाटा एसी गोल्ड **MH14KA4253** वायओएम–२०२२ राखीव किंमत :२०७०००/– ५–सीबी एलपीटी–१५१२ **FULLY_BUILT_GOODS MH42BF1356** वायओएम – २०२२ राखीव किंमत : ११०२५००८ – ६ – सीबी **FURIO_17_D_MAHINDRA_N_MAHINDRA MH15JC2786** वायओएम –२०२२ राखीव किंमत :१२९१५००/– ७– टाटा इन्ट्रा **V30_COMMERCIAL VEHICLE MH14KQ3924** वायओएम –२०२३ राखीव किंमत ३३७५००/– ८– सीबी–एलपीटी **_1512_FULLY_BUILT_GOODS MH15HU3530** वायओएम –२०२२ राखीव किंमत : १०५७५००/– ९– सीबी – प्रो **_2114_HSD_EICHR_VECV MH14KA2207** वायओएम –२०२२ राखीव किंमत : ८५५०००/– १० – सीबी – प्रो **__2114_HSD_EICHR_VECV MH14KA2206** वायओएम –२०२२ राखीव किंमत : ८९५५०० ११– सीबी**_WIRTGEN SOIL COMPACTOR HAMM 311 WHBOH216THAAO5316** वायओएम –२०२१ राखीव किंमत :१७८२०००/–
मेसर्स कोटक सह महिंद्रा बँक त्याच्या हायपोथेकशन अंतर्गत विक्री करत आहे. गाडी ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत विक्री करण्यात येईल.
इच्छुक खरेदीदारांनी खालील पत्त्यावर ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने शाखेच्या पत्त्यावर १५ दिवसांच्या आत किंवा २२.०९. २०२३ पूर्वी त्यांचे कोटेशन देऊ शकतात.
शाखेचा पत्ता : कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड, न्याती युनिट्री, चौथा मजला, झोन पश्चिम–३, सम्राट अशोक रोड, नगर रोड, गुंजन कार्नर, येरवडा पुणे–४११००६ किंवा **संपर्क : योगेश नितुरे**
कोटक महिंद्रा बँक लि.
संपर्क/९७६४४४४५७६ ईमेल : yogesh.niture@kotak.com

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24–परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचा अधिकृत अधिकारी प्रतिभूतीकरण आणि वित्तीय मत्तांची पुनर्बांधणी आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 (54 वर्ष 2002) अन्वये आणि सदर कायद्यान्वये प्राप्त शक्तींचा वापर करत पुढील मालमत्तेचा **'जिथे आहे तिथे तत्त्वावर'** आणि **'जे आहे ते'** परिस्थितीत **'जाहीर ई–लिलावाच्या'** माध्यमातून देय रकमा आणि त्यांवरील व्याज, शुल्के आणि खर्च इ. वसुल करण्यासाठी ई–लिलाव करत आहे.

कर्जदार आणि सह–कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 05.09.2023 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. गणेश अशोक बागडे 2. गीता गणेश बागडे 3. बागडे ज्वेलर्स (तिचे भागीदार गणेश अशोक बागडे ह्यांच्या मार्फत)	मालमत्तेचा पत्ता : रो हाऊस क्र. 3, अधिमापन 120.68 चौरस मीटर म्हणजेच 1299 चौरस फूट, तळमजला + पहिला मजला, विंग एफ, गच्चीचे अधिमापन 549 चौरस फूट, 'फ्लोरेंटाइन व्हिला' नावाच्या स्कीममध्ये, जी अशा जमिनीवर बांधलेली आहे जिचे (अ) अधिमापन सुमारे 4988 चौरस मीटर, स.क्र. 60A/2/1B + 2/1C/1/2, 60A/2/1B + 2/1C/1/3, 60A/2/1B + 2/1C/1/4, 60A/2/1B + 2/1C/1/5, 60A/2/1B + 2/1C/1/6 AND 60A/2/1B + 2/1C/1/7 (ब) अधिमापन 00हे, 13 आर, स.क्र. 60A/2/1C/2, (क) अधिमापन 00हे, 13.12 आर स.क्र. 60A/2/1B + 2/1C/1/1, (ड) अधिमापन 1950 चौरस मीटर स.क्र. 60A/2/1A, (ई) अधिमापन 00हे, 10 आर स.क्र. 60A/1/4/2, (फ) अधिमापन 698.28 चौरस मीटर, स.क्र. 60A/1/3, प्लॉट क्र. 6 आणि 7, महसूल गाव घोरपडी येथे स्थित, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीमध्ये, आणि नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीमध्ये, उपनिबंधक नोंदणी हवेली आणि जिल्हा पुणे	PUNHL18 002200 & PUNHL18 002317 & PUNHL21 000002	31 ऑगस्ट 2023	रु. 25,09,360/–	रु. 3,36,46,483.44/–	रु. 2,50,93,600/–	18/09/2023	23/09/2023 सकाळी 11 वाजता

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. जाहीर ई–लिलाव उपरोक्त दिनांक व वेळेरोजी पार पाडण्यात येईल, व सदर वेळी उपरोक्त प्रतिभूत मत्तांची **'जिथे आहे तिथे'** तत्त्वावर आणि **'जे आहे ते'** तत्त्वावर विक्री केली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **21/09/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **23/09/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **25/09/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : शेखर काळे, एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126 एल अँड टी फायनान्स लि, – कार्यालय : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 07.09.2023
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/–
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग पुणे, यांचे कार्यालय
१ ला मजला, नविन मध्यवर्ती इमारत (विस्तारीत), पुणे- ४११००१

दूरध्वनी: ०२० - २६१२६२५८ email :- elpune.ee@mahapwd.gov.in

निविदा सुचना क्र. ३० / २०२३-२०२४.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग, पुणे हे महाराष्ट्र शासनाकडील अनुज्ञाप्तीधारक नोंदणीकृत किंवा अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारांकडून B-1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahapwd.com वरील Pay PWD Online या पोर्टलवरून डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

सदर निविदेत एकूण १२ कामे आहेत.

१. निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०७/०९/२०२३ ते दिनांक १४/०९/२०२३
२. निविदा पुर्व बैठक व स्थळ : निरंक
३. निविदा उघडणे : दिनांक १८/०९/२०२३ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विद्युत विभाग पुणे, यांचे कार्यालय १ ला मजला, नविन मध्यवर्ती इमारत (विस्तारीत), पुणे ४११००१.
४. खालील संकेतस्थळावर निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
www.mahapwd.gov.in

सही/-
(मा.रं. शिंदे)
कार्यकारी अभियंता
सा.बां. पुणे विद्युत विभाग, पुणे

जिमाका/पुणे/जाहिरात/२७७/२०२३-२४

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com